# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ३७

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **गुरुवार दिनांक ०९/१०/२०२५ दुपारी १२-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति. आयुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ५. | श्रीमती स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ६. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ७. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ८. | श्री बाळासाहेब तट्टु | मुख्य लेखाअधिकारी |
| ९. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| १०. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ११. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र.आरोग्याधिकारी |
| १२. | श्री  वर्षा घुगरी | कार्य. अभियंता बांधकाम |
| १३. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य.अभियंता |
| १४. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १५. | श्री के.डी साबळे | लिपीक आस्थापना विभाग |
| १६. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १७. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १८. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १९. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| २०. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| २१. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| २२. | श्री अनिल भडागे | प्र. वाहन विभाग प्रमुख |
| २३. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २४. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष अधिकारी |
| २५. | श्रीमती मिना सातभाई | समाज विकास अधिकारी |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे

# सदर बैठकीत पारीत झालेले ठराव व प्रस्ताव

---

**प्रशासक ठराव क्र.५५६** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /वि.वि. /जा.क्र.१३८ दिनांक २५/०८/२०२५

विषय क्रमांक:-५७८ धुळे महानगरपालिका हद्द्तीतील सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मनपा निधी अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना सन २०२४-२५ निश्चित विद्युत विषयक अ.क्र ३ कामाच्या अंदाजपत्रकातील नवीन पोल व हायमास्ट पोलवर नवीन एल.ई.डी म.न.पा मार्फत बसविणेकामी निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंता, विद्युत विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिका हद्द्तीतील सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मनपा निधी अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना (२२१७०९१३) दि.०८ ऑक्टोबर २०२४ अन्वये सन २०२४-२५ निश्चित विद्युत विषयक अ.क्र 3 कामाच्या अंदाजपत्रकातील नवीन पोल व हायमास्ट पोलवर नवीन एल.ई.डी म.न.पा मार्फत बसविणे.( मनपा निधी २०२५-२६) उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव तसेच मा. जिल्हाधिकारी सो. यांची प्रशासकीय मान्यता म. जिल्हाधिकारी. धुळे यांच्याकडील प्रशासकीय मान्यता आदेश : म. जिल्हाधिकारी प्रशासकीय मान्यता अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु. ६२,७६,४७७ /- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.आदेश इलेक्ट्रिकल & इंटरप्राईजेस , पुणे. | शे. -17.890 कमी दराने | L1 |
| २ | मे. ओम श्री मंगलमूर्ती इले.& Contractor, नाशिक | अंदाजपत्रकीय दराने | |
| ३ | मे. मार्तंड इंटरप्राईजेस, नाशिक | शे. +2 जास्त दराने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता ठेकेदार मे.आदेश इलेक्ट्रिकल & इंटरप्राईजेस , पुणे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. ५१,५३,६१५.२६५/- इतक्या रकमेची असुन शे. -१७.८९० कमी दराची आहे.वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून ठेकेदार मे.आदेश इलेक्ट्रिकल & इंटरप्राईजेस , पुणे यांचे दर अंदाजपत्रकीय / शे. -१७.८९० कमी / जास्त आहे. त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार मे.आदेश इलेक्ट्रिकल & इंटरप्राईजेस , पुणे यांची अंदाजपत्रकीय / शे. -१७.८९० कमी / जास्त दराने आलेले निविदा दर कलम ४५२ अ च्या (१ अ)व (१ ब)नुसार महानगरपालिका स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिका हद्द्तीतील सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मनपा निधी अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना सन २०२४-२५ निश्चित विद्युत विषयक अ.क्र ३ कामाच्या अंदाजपत्रकातील नवीन पोल व हायमास्ट पोलवर नवीन एल.ई.डी म.न.पा मार्फत बसविणेकामी मे.आदेश इलेक्ट्रिकल & इंटरप्राईजेस , पुणे. यांच्या शे. -१७.८९० कमी या आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५५७** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /बां.वि. /जा.क्र.२९८ दिनांक १९/०९/२०२५

विषय क्रमांक:-५७९ धुळे महानगरपालिका निधी अंतर्गत प्र.क्र.४ मध्ये वाडीभोकर रोड उत्तर मुखी मारुती मंदिरापासून ते आग्रा रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणेकामी निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिका निधी सन २०२५-२६ अंतर्गत प्र.क्र.४ मध्ये वाडीभोकर रोड उत्तर मुखी मारुती मंदिरापासून ते आग्रा रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे बाबतच्या कामास धुळे म.आयुक्त सो यांनी जा.क्र./धुमपा.बां.वि./२५/२०२५-२६ दि.२६/०५/२०२५ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ४९,०५,६४०/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./६१/२०२५-२६ दि.26/05/2025अन्वये रक्कम रु. ४९,०५,६४०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे.गिरीष चिंतामण मराठे | शे.-०.९९ % कमीने | **सर्वात कमी दर** |
| २ | मे. शुभम संजीव मोरे | शे.१.००% जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.गिरीष चिंतामण मराठे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ४८,५७,०७३/- इतक्या रक्कमेचे असून शे.-०.९९% कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/**मे.**गिरीष चिंतामण मराठे यांचे दर शे.-०.९९% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/

मे.गिरीष चिंतामण मराठे यांची शे.-०.९९ % कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवलानुसार व प्रस्तावानुसार धुळे महानगरपालिका निधी अंतर्गत प्र.क्र.४ मध्ये वाडीभोकर रोड उत्तर मुखी मारुती मंदिरापासून ते आग्रा रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणेकामी मे.गिरीष चिंतामण मराठे यांच्या शे.-०.९९ % कमी या आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

सदरचे काम अमृत अभियान १ अंतर्गत केलेल्या भूमिगत गटार योजनेच्या कामामुळे खराब झालेला आहे. व उक्त योजनेचा मनपा हिस्सा अदा करावयाचा आहे त्यामुळे सदर मनपा हिस्स्यातून उक्त कामाचा रोड रिस्टोरेशनचा खर्च वजावट करावा. तसेच या स्वरुपाचे अन्य कामांचाही खर्च मनपा हिस्स्यातून वजा करावा.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५५८** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /पा.पु. /जा.क्र.५६० दिनांक २५/०८/२०२५

विषय क्रमांक:-५८० धुळे शहरातील विविध जलकुंभ वॉश आउट करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्य. अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे शहरातील विविध जलकुंभ वॉश आउट करणे बाबत. उक्तबाबत संबधित भागातील क. अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता धुळे शहरातील विविध जलकुंभ वॉश आउट न केल्यामुळे जलकुंभाच्या तळाशी गाळ साचलेला आहे. त्यामुळे जलकुंभातून पाणीपुरवठा करण्यात येणारे पाणी गढुळ व दुषित होण्याची संभावना नाकारता येत नाही. करिता जलकुंभाच्या तळाशी साचलेला गाळ काढण्याकरिता सदर जलकुंभ तात्काळ वॉश आउट करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्तावात नमुद शहरातील एकुण १० जलकुंभातील गाळ काढुन वॉश आऊट करण्यात आलेले आहेत.

सदरचे कामी Desilting the supply Well, Intake Well / Head works, sump of water supply/Sewerage works, Lifts upto ९M & Lead upto १५०M, stacking, spreading, Dewatering the excavated trenches, pumps, labour, Mazdoor (Heavy) इत्यादी बाबी समाविष्ट असून, सदर कामासाठी शासन दरसूची/म.जी.प्रा.विभाग/२०२३-२४ नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. ५,८४,९२९/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार पाईप लाईन दुरुस्ती निधीतुन कामासाठी रू. २.०० कोटी मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. रू. ५,८४,९२९/- चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा श्री. गुरुकृपा हायजेनिक वॉटर टँक क्लिनिंग सर्विसेस ठेकेदार यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता मे. स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार धुळे शहरातील विविध जलकुंभ वॉश आउट करणेकामी श्री. गुरुकृपा हायजेनिक वॉटर टँक क्लिनिंग सर्विसेस ठेकेदार यांचेमार्फत झालेला खर्च रुपये ५,८४,९२९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) नुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५५९** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /बां.वि. /जा.क्र.२६८ दिनांक ०४/०९/२०२५

विषय क्रमांक:-५८१ धुळे मनपा अंतर्गत बारापत्थर येथील मनपा शाळा नं.८ मध्ये नवीन Septic Tank तयार करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंत, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे मनपा अंतर्गत बारापत्थर येथील मनपा शाळा नं.८ मध्ये नवीन Septic Tank तयार करणे आवश्यक आहे. कारण कि सदर ठिकाणी Septic Tank हे तुटल्यामुळे सदरील Tank मधील मैला हा बाहेर येत असून त्यामुळे शाळेच्या आवारात दुर्गंधी पसरल्याने परिसरातील विद्यार्थी व कर्मचारी यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला असल्याने सदर ठिकाणी नवीन Septic Tank तयार करणे आवश्यक आहे.

सदर ठिकाणी समक्ष पाहणी करून त्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून त्यास अंदाजपत्रकीय खर्च रु ३८,०३२/- मात्र येणार आहे. सदरील खर्च हा सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या दरसूची नुसार असून तो खर्च बाजार भावाप्रमाणे योग्य व वाजवी आहे.

तरी उक्त काम हे विना निविदा मे. रामेश्वर ट्रेडर्स, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले असून मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार धुळे मनपा अंतर्गत बारापत्थर येथील मनपा शाळा नं.८ मध्ये नवीन Septic Tank तयार करणेकामी झालेला खर्च रु ३८,०३२/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) नुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५६०** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /वि.वि./जा.क्र.१५८ दिनांक ०४/०९/२०२५

विषय क्रमांक:-५८२ धुळे महानगरपालिका अंतर्गत अक्कलपाडा पाणीपुरवठा रॉ-वॉटर पपिंग चालविणे, WTP चालवणे व अक्कलपाडा ते धुळे MBR पाईप लाईनची देखभाल करणे इत्यादी कामे आउट सोर्सिंगव्दारे करणे कामास मक्तेदारास २ वर्ष मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंत, विद्युत विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिका अंतर्गत अक्कलपाडा पाणीपुरवठा रॉ-वॉटर पपिंग चालविणे, WTP चालवणे व अक्कलपाडा ते धुळे MBR पाईप लाईनची देखभाल करणे इत्यादी कामे आउट सोर्सिंगव्दारे करणे काम दि.०१/०१/२०२४ ते ३१/१२/२०२४ पावतो (१ वर्ष) कार्यादेश बडगुजर & कंपनी,नाशिक यांना देण्यात आला होता. सदर कामाचे ९,५०,००० /- प्रती महिना प्रमाणे आहेत.

मक्तेदार यांच्या पत्रान्वये वरील अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेची दैनिक देखभाल दुरुस्ती करणे ह्या कामाचे कार्यादेश आम्हाला मिळाले असून आम्ही दिनांक ०१.०१.२०२४ पासून सदर काम करत आहोत.सदर कामाची मुदत १ वर्ष कालावधीची होती व दिनांक ३१.१२.२०२४ रोजी संपली आहे. अत्यावश्यक सेवेचे काम असल्या कारणाने आम्ही कामाची मुदत संपल्यानंतर देखील काम चालू ठेवले आहे. तसेच पुढील कामासंदर्भात आपल्याकडून लेखी आदेश मिळावे आणि मुदत संपल्यानंतर च्या कालावधीकरिता सुधारित दराने बिल देण्यात यावे हि विनंती केलेली आहे.

उक्त धुळे महानगरपालिका अंतर्गत अक्कलपाडा पाणीपुरवठा रॉ-वॉटर पपिंग चालविणे, WTP चालवणे व अक्कलपाडा ते धुळे MBR पाईप लाईनची देखभाल करणे इत्यादी चालविण्याकामी कामासाठी कार्यालयीन टिप्पणी दि.०४/०३/२०२५ रोजी म.आयुक्त तथा प्रशासक यांनी पुढील निविदा होवू स्तव मान्यता दिली आहे त्यानुसार म.न.पा पत्र पा,पु/१०४ दि.२४/०३/२०२५ नुसार १ जानेवारी २०२५ पासून पुढील मक्तेदार निश्चित होई पावतो मुदत वाढ देण्यात आली आहे.

मक्तेदार बडगुजर & कंपनी,नाशिक यांच्या पत्रान्वये दि.३१.१२.२०२४ रोजी सदर कामाची मुदत संपल्यानुसार सदर कामाला दि.०१ जानेवारी २०२५ पासून ३१ जानेवारी २०२६ पावतो २ वर्ष मुदत वाढ मिळावी बाबत विनंती केली आहे.

म.न.पा कार्यदिश जा.क्र./धुमपा/वि.वि/०९ दि.०६/१२/२०२३ मंजूरदरा प्रमाणे मक्तेदार बडगुजर & कंपनी,नाशिक यांच्या कडून करणे आवश्यक आहे. यास्तव सदरचा विषय निर्णय घेणेस्तव स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवलानुसार व प्रस्तावानुसार धुळे महानगरपालिका अंतर्गत बडगुजर & कंपनी,नाशिक यांना अक्कलपाडा पाणीपुरवठा रॉ-वॉटर पपिंग चालविणे, WTP चालवणे व अक्कलपाडा ते धुळे MBR पाईप लाईनची देखभाल करणे इत्यादी कामे आउट सोर्सिंगव्दारे करणेचे कामास मागील मंजुर दराप्रमाणे ठरावाच्या दिनांकापासून २ वर्षासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५६१** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /पा.पु.वि. /जा.क्र.२८८ दिनांक १५/०९/२०२५

विषय क्रमांक:-५८३ धुळे शहर पाणी पुरवठा केंद्र योजना बाभळे जलशुद्धीकरण केंद्र येथे आवारास संरक्षण भिंत बांधणे कामी झालेल्या वाढीव खर्चास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंत, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे शहर पाणी पुरवठा केंद्र योजना बाभळे जलशुद्धीकरण केंद्र येथे आवारास संरक्षण भिंत बांधणे बाबतचे काम, धुळे मनपा विकासशुल्क निधी २०२४-२५ ह्या आर्थिक वर्षातील योजने अंतर्गत मनपा मार्फत 'ई' निविदा पद्धतीने पूर्ण करणेत आले असून निविदा प्रक्रिया पूर्ण करून मक्तेदार एजन्सी. मे. गायत्री कन्सट्रक्शन , धुळे यांना वरील कामाचा कार्यादेश देण्यात आला. प्रस्तावित कामास रक्कम रुपये २,१८,६६,९२९/- मात्र चे खर्चास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रकात एकूण ७५५.०० मीटर लांबीची आरसीसी स्ट्रक्चर सह वीट बांधकाम करून संरक्षक भिंत बांधणे व त्यावर चेनलिंक फेन्सिंग जाळी बसविणे सह मुख्य प्रवेश द्वाराची उभारणी करणे सह इतर अनुषंगिक बाबींचा समावेश आहे. सद्य स्थितीत झालेल्या कामाचे मोजमाप घेऊन २ रे व अंतिम देयक सादर करण्यात आले असून प्राप्त परिस्थितीत एकूण १०३८.०० मीटर लांबीची संरक्षक भिंत बांधणेचे कामा सह मुख्य प्रवेश द्वाराची कामे पूर्ण करण्यात आले असून सदर जागेत मनपा मार्फत सोलर प्लांट वीज निर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार असल्याने उपलब्ध जागेच्या पूर्ण क्षमते नुसार संरक्षक भिंतीचे काम करण्यात आले आहे. त्यामुळे सदर कामात २८३.०० मीटर ने वाढ झाल्याने अंदाजपत्रकातील बहुतांश बाबीत वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे प्रवेश द्वाराच्या दर्शनी भागात नामफलक लावणे आवश्यक असल्याने उक्त बाबीचा अतिरिक्त बाब म्हणून देयकात समावेश करणेत आला दुसरे व अंतिम देयका पावेतो रक्कम रुपये २,७०,५९,२५२/- रू. मात्र खर्च झाला आहे.

प्रस्तावित खर्चापेक्षा रु.४५.५९ लक्ष मात्र जास्तीचा व २५.०४% वाढीव खर्च झालेला आहे. सदरचा वाढीव खर्च प्रस्तावित खर्चापेक्षा १०% पेक्षा जास्त असल्याने मा. स्थायी समिती ,धुळे मनपा यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कामातील झालेल्या फेरबदलास तसेच मक्तेदारास कामाचे देयक अदा होणेसाठी मे. स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार धुळे शहर पाणी पुरवठा केंद्र योजना बाभळे जलशुद्धीकरण केंद्र येथे आवारास संरक्षण भिंत बांधणे कामी झालेल्या संभाव्य वाढीव खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५६२** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /पा.पु./जा.क्र.६३९ दिनांक १६/०९/२०२५

विषय क्रमांक:-५८४ भंगार बाजार, दिलदार नगर आणि भांग वाली गल्ली ची बोळ येथे HDPE पाईप लाईन टाकणेकामी झालेल्या कार्योत्तर खर्च मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्य. अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

भंगार बाजार दिलदार नगर आणि भांग वाली गल्ली ची बोळ येथे HDPE पाईप लाईन टाकणे बाबत. उक्तबाबत संबधित भागातील क.अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता नकाणे गावात सिमेंट पाईप लाईन गळती होत असल्यामुळे स्थलांतरित करणे गरजेचे होते.

सदरचे कामी excavation soft, excavation rock, providing & laying HDPE 110 mm pipe, providing & laying sluice valve, M-20, labour, fitter,Rent for JCB इत्यादी बाबी समाविष्ट असून, सदर कामासाठी शासन दरसूची/म.जी.प्रा.विभाग/२०२३-२४ नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. २,८०,५३१/- मात्र खर्च अपेक्षित आहे.सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार पाईप लाईन दुरुस्ती निधीतुन कामासाठी रू. २०० लक्ष मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,८०,५३१/- चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा ठेकेदार श्री. इसाक शब्बीर शेख ठेकेदार यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार भंगार बाजार, दिलदार नगर आणि भांग वाली गल्ली ची बोळ येथे HDPE पाईप लाईन टाकणेकामी झालेला खर्च २,८०,५३१/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३)नुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५६३** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /पा.पु./जा.क्र.६४० दिनांक १६/०९/२०२५

विषय क्रमांक:-५८५ जुना धुळे, भोई गल्ली आदर्श व्यायाम शाळा जवळ HDPE पाईपलीन टाकणेकामी झालेल्या कार्योत्तर खर्च मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्य. अभियंत, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जुना धुळे, भोई गल्ली आदर्श व्यायाम शाळा जवळ HDPE पाईपलीन टाकणे बाबत उक्तबाबत संबधित भागातील क.अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता नकाणे गावात सिमेंट पाईप लाईन गळती होत असल्यामुळे स्थलांतरित करणे गरजेचे होते.

सदरचे कामी excavation soft, excavation rock, providing & laying HDPE 110 mm pipe, providing & laying sluice valve, labour, fitter,Rent for JCB इत्यादी बाबी समाविष्ट असून, सदर कामासाठी शासन दरसूची/म.जी.प्रा.विभाग/२०२३-२४ नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. २,५८,१४९/- मात्र खर्च अपेक्षित आहे.सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार पाईप लाईन दुरुस्ती निधीतुन कामासाठी रू.२०० लक्ष मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,५८,१४९/- चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा ठेकेदार श्री. इसाक शब्बीर शेख ठेकेदार यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता मे. स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार जुना धुळे, भोई गल्ली आदर्श व्यायाम शाळा जवळ HDPE पाईपलीन टाकणेकामी झालेला खर्च रु. २,५८,१४९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) नुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५६४** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /आस्था /जा.क्र.७९८ दिनांक १६/०९/२०२५

विषय क्रमांक:-५८६ धुळे महानगरपालिकेतील डॉ.जे.सी.पाटील, शहर क्षयरोग अधिकारी (मानधन) यांना पुर्ननियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्या अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील कार्यरत शहर क्षयरोग अधिकारी डॉ जे सी पाटील यांची मानधनावरील नियुक्तीचा कालावधी त्यांच्या नावासमोर नमूद नुसार संपुष्ठात येत आहे.

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव | पदाचे नाव | मुदत संपुष्टात आलेला दिनांक | मानधन |
|---|---|---|---|---|
| **१** | **डॉ जे सी पाटील** | **शहर क्षयरोग अधिकारी** | **०६/९/२०२५** | **रु. ५०,०००/-** |

तरी डॉ. पाटील यांची सेवा संबंधित विभागाकरिता आवश्यक असल्याने वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी उक्त नमूद अधिकारी यांना पुर्ननियुक्ती देणेबाबत शिफारस केलेली आहे.

मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार उक्त मानधनावरील शहर क्षयरोग अधिकारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार में. स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाला व प्रस्तावानुसार धुळे महानगरपालिकेतील डॉ जे सी. पाटील, शहर क्षयरोग अधिकारी (मानधन) यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५६५** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /आस्था/जा.क्र.७९७ दिनांक १६/०९/२०२५

विषय क्रमांक:-५८७ मानधनावरील कनिष्ठ अभियंता, औषध निर्माता व डाटा ऐंट्री ऑपरेटर (संगणक लिपीक) व वॉचमन कर्मचारी यांना ६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्या. अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मानधनावरील कनिष्ठ अभियंता, औषध निर्माता व डाटा ऐंट्री ऑपरेटर (संगणक लिपीक) व वॉचमन कर्मचारी यांना फेर नियुक्ती पुढील ०६ महिने करीता एकत्रित मानधन तत्वावर देण्यात आलेली होती. त्यांची नियुक्ती त्यांच्या नावासमोर नमुद दिनांकास संपुष्ठात आलेली आहे.

तथापी प्रस्तावात नमूद अ.क्र. १ ते ८ मानधनावरील कर्मचारी यांनी पुढील ६ महिनेकरीता एकत्रित मानधनावर फेर नियुक्ती मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार उक्त मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिन्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार मुदतवाढ देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाला व प्रस्तावानुसार धुळे महानगरपालिकेतील प्रस्तावात नमूद अ.क्र. १ ते ८ मानधनावरील कनिष्ठ अभियंता, औषध निर्माता व डाटा ऐंट्री ऑपरेटर (संगणक लिपीक) व वॉचमन कर्मचारी

यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५६६** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / पा.पु.वि./जा.क्र.२९७ दिनांक १९/०९/२०२५

विषय क्रमांक:-५८८ केंद्र व राज्य शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत धुळे शहर वाढीव पाणीपुरवठा योजना (स्थापत्य कामे व विद्युत व यांत्रिकी कामे) कामास मुदतवाढ मिळणे कामी राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे पाठविणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्य. अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिकेतील सुरु असलेल्या, केंद्र व राज्य शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत धुळे शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम सध्या प्रगती पथावर आहे.उपरोक्त धुळे शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. स्थापत्य कामासाठी कार्यादेश देण्यात आलेला आहे. व विद्युत व यांत्रिकी कामासाठी कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरील कामाची मूळ मुदत ही १८ महिने असून सदर मुदत दि.१४/०९/२०२५ रोजी संपुष्टात येत आहे.

मे. जयदीपराज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी स्थापत्य कंत्राटातील कामे व मे.बडगुजर अॅन्ड कंपनी,नाशिक यांनी विद्युत व यांत्रिकी व विद्युत कंत्राटातील उर्वरित कामे पूर्ण करणे करिता महापालिकेस पाठवलेल्या पत्र आणि बार चार्ट नुसार दि.१४/०९/२०२६ पर्यंत पूर्ण करणे शक्य असल्याचे नमूद केलेले आहे.

केंद्र पुरस्कृत अमृत २.०. अभियानांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या हेतूने राज्य शासनाकडून परिपत्रकामध्ये योजना अंमलबजावणी कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करणेत आलेल्या आहेत. त्यानुसार केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत प्रगतीत असलेल्या प्रकल्पाची कालमर्यादा संपल्यानंतर वाढीव मुदतवाढ देताना स्वीकृत निविदाधारक यांचेकडून पुढील किती कालावधीमध्ये प्रकल्प पूर्ण होईल याबाबत लिखित स्वरुपात घेऊन व त्यानुसार निविदाधारक यांनी सादर केलेल्या वास्तववादी नियोजनाच्या (बारचार्ट) आधारे म.न.पा. स्तरावर मा. आयुक्त यांनी ४ महिन्यांपर्यंत वाढीव मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणेबाबत सूचित केलेले आहे.तसेच सदर मुदतवाढीबाबत मुदतवाढ दिल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समिती/ राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे अवलोकनार्थ सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

योजना पूर्ण करणेकामी ४ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी मुदतवाढ द्यावयाची असल्यास ती मुदतवाढ राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समिती/ राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या मान्यतेने द्यावी व त्यासाठी आवश्यक प्रस्ताव ठोस कारणमीमांसेसह संबंधित अभियानाच्या नोडल एजन्सीमार्फत सादर करणेबाबत सूचित केले आहे.

त्या अनुषंगाने निविदाधारकाने केलेल्या विनंती नुसार एक (०१) वर्ष मुदतवाढ देणेस हरकत नसावी असे वाटते.योजनेतील उपांगांची कामे पूर्ण होण्यासउशीर होण्याची कारणमिमांसा प्रस्तावात नमूद आहे.

माहे- ऑगस्ट पावेतो स्थापत्य कामाचे 66% भौतिक प्रगती व विद्युत व यांत्रिकी कामाची 25% प्रगती झालेली आहे. उक्त बाबत 04 महिने पेक्षा अधिक कालावधीसाठी मुदतवाढ द्यावयाची असल्यानेसदर मुदतवाढिस राज्यस्तरीय तांत्रिक समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे उपरोक्त कामास 12 महिने मुदतवाढ मिळणे कामीचा प्रस्ताव राज्यस्तरीय प्रकल्प समिती/राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या मान्यतेस सादर करणेस तसेच विषयांकित प्रस्ताव मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, केंद्र व राज्य शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत धुळे शहर वाढीव पाणीपुरवठा योजना (स्थापत्य कामे व विद्युत व यांत्रिकी कामे) कामास १ वर्ष मुदतवाढ मिळणे कामी व राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५६७** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / मु.ले.प. कार्या./जा.क्र.२९ दिनांक ०२/०९/२०२५

विषय क्रमांक:-५८९ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये लेख्यांचा साप्ताहिक तपासणी अहवाल स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर.

---

वाचा क्र.०१ व मुख्य लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५(१) अन्वये विहीत करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी दि. ०१/०८/२०२५ ते दि. ०८/०८/२०२५ पर्यत तसेच दि.११/०८/२०२५ ते दि. १४/०८/२०२५ तसेच दि. १८/०८/२०२५ ते दि. २२/०८/२०२५ पर्यंत तसेच दिनांक २५/०८/२०२५ ते दि. २९/०८/२०२५ पर्यंत तपासणी करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा. लेखा परीक्षक यांच्या मार्फत उक्त कालावधीत झालेल्या साप्ताहिक तपासणी लेख्यांचा अहवाल मे.स्थायी समिती समोर वाचून सादर करण्यांत आला. या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने सादर केलेल्या अर्धसमास पत्रांबाबत तातडीने अनुपालन करण्याबाबत दक्षता घ्यावी.

याबाबत मुख्य लेखाधिकारी यांनी संबंधित विभागांकडून अनुपालनाबाबत आवश्यक ती पूर्तता करावी. तसेच याबाबत लेखापरीक्षण विभागाने संबंधित विभागांशी समन्वय ठेऊन कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५६८** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / मु.ले.प. कार्या./जा.क्र.२८ दिनांक २१/०८/२०२५

विषय क्रमांक:-५९० महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ थे कलम १०६(१) (अ) अन्वये अहवाल सादर करणे बाबत बांधकाम मंजुरी प्रकरणात वसूल केलेल्या कामगार उपकर रकमा शासन खाती भरणा न केल्याने शासकीय निधीच्या तात्पुरत्या गैरवापरा बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व मुख्य लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

इमारत बांधकाम परवानगी करीता शासनाने BPMS (Building Permission Management System प्रणाली विकसीत केलेली आहे. सदर प्रणाली चे माध्यमातून धुळे महानगरपालिकेकडुन इमारत बांधकाम परवानगीची प्रकरणे हताळली जावून प्रणालीद्वारे बांधकाम विकास शुल्क वसुली व बांधकाम मंजुरी प्रमणपत्रनिर्गमीत करण्यात येतात. सदरप्रणाली मध्ये विकास शुल्क, तपासणी शुल्क, मटेरीयल फी, कामगार उपकर इत्यादी रकमांचे वसूली करीता प्रणाली मार्फत Online Payment Mode जसे UPI, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेट बॅकींग द्वारे उपरोक्त रकमा भरणेची सुविधा उपलब्ध असुन या सोबतच् उपरोक्त रकमा थेट पणे महानगरपालिकेच्या संबंधीत विकास शुल्क बँक खातेवर व कामगार उपकर या साठी शासनाने निहित केलेल्या बँक ऑफ इंडिया खाते क्र. ००४२२०१ १००००१५३ वर बँक RTGS द्वारे जमा करुन सदर जमेची पावती BPMS प्रणालीवर Upload करणेची सुविधा देण्यात आलेली आहे. उपरोक्त दोन्ही पर्यायांचा वापर करणेची सविधा BPMS प्रणालीमध्ये देण्यात आलेली असल्याने वापरकर्त्या मार्फत सदर पर्यायांचा वापर केला जातो.

शासन निर्णय क्र. बी.सी.ए.2007/ प्र.क्र.788/ कामगार 7-अ दिनांक 26/ 10/2009 अन्वये जमा झालेला कामगार उपकर सदर रक्कम जमा झालेच्या तारखेपासून ३० दिवसाचे आत शासनाने यासाठी विहीत केलेल्या बॅक ऑफ इंडिया खाते क्र. ००४२२०१००००१५३ वर जमा करणे संबंधित विकास प्राधिकरणास बंधनकारक करण्यात आले आहे.

ईमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम 1961 चे कलम 3(३) व ईमारत व इतर बाधकाम कामगार कल्याण उपकर नियम 1998 चे नियम 5(2) चे तरतुदीनुसार स्थानिक प्राधिकरणानेवसूल केलेला कामगार उपकराच्या 1% पेक्षा अधिक नाही एवढा वसुलीचा खर्च कमी करून उर्वरित कामगार

उपकराची रक्कम कामगार कल्याण बोर्डाच्या विहित केलेल्या बँक खात्यात वसूल केल्याच्या तारखेपासून 30 दिवसाचे आत जमा केली पाहिजे.

धुळे महानगरपालिकेच्या सन २०२३-२०२४ चे नगररचना बांधकाम पंरवानगी प्रकरणांचे तपासणीत कामगारउपकराची एकुण रु.३.३६.५६.५५२/- रक्कम जमा झाल्याचे BPMS प्रणालीद्वारे महानगरपालिकेस वर्ग झालेल्या रकमांचे तपशिलावरुन दिसुन येते. सदर रकमेपैकी RTGS द्वारे थेटपणे कामगार उपकरापोटी विहीत बँक खातेवर सन-2023-2024 या कालावधीत रु.८५१२६०१/- त्याचवेळी वर्ग झालेली असुन एकण 33656552-8512601 = २,५१.,४३,९५१ रक्कम BPMS प्रणाली द्वारे महानगरपालिकेच्या विकास शुल्क खात्यावर वर्ग झाल्याचे दिसुन येते.

प्रत्यक्षात शासन निर्णय क्र. बी.सी.ए. 2007/ प्र.क्र. 78 8/ कामगार 7-अ दिनांक 26/ 10/2009 चे तरतुदीनुसार नगर रचना विभागाने BPMS द्वारे महानगरपालिकेडे वर्ग झालेल्या कामगार उपकराच्या रकमा यासाठी शासनाने विहीत केलेल्या बँक ऑफ इंडिया खाते वर दरमहा जमा करणे अपेक्षीत असतांना विभागाने सदर रक्कम शासन खाती जमा झालेली नाही.सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व कार्यालयीन अहवाल विचारात घेता, खालील प्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

१. नगररचना विभागामार्फत महानगर पालिकेत BPMS प्रणाली लागू झाल्यापासून बांधकाम मंजूरी प्रकरणात वसूल झालेला कामगार उपकराच्या रकमा व यासाठी शासनाने विहीत केलेल्या बँक ऑफ इंडीया खाते नगर क्र. ००४२२०११००००१५३ वर प्रत्यक्षात चलनाने जमा केलेल्या रकमा यांचा ताळमेळ घेण्यात यावा.

2. नगररचना विभाग व लेखा विभागाने संयुक्तपणे, BPMS प्रणाली मार्फत वसूल करण्यात आलेला कामगार उपकर व महानगरपालिकेचे विकास शुल्क जमा करणेसाठी निहीत केलेल्या, HDFC बँक खाते क्र. XXXX५२३७ वर BPMS प्रणाली मार्फत Redirect झालेल्या कामगार उपकराच्या रकमांचा ताळमेळ घेवून इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९६१, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ व शासन निर्दशनानुसार सदर Redirect झालेल्या रकमा तात्काळ शासन खाती जमा करणेची कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५६९** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /का.अ /पा.पु./जा.क्र.६८७ दिनांक २४/०९/२०२५

विषय क्रमांक:-५९१ प्रभाग क्र १ ते ५ व १० मधील वितरण व्यवस्था व मुख्य लाईनचे लिकेज दुरुस्तीच्या कामास मुदतवाढ देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्य.अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

प्रभाग क्र १ ते ५ व १० मधील वितरण व्यवस्था व मुख्य लाईनचे लिकेज दुरुस्ती करणे या कामाचा कार्यादेश जा.क्र./धुमपा/५८८/दि.२८/०३/२०२३. नुसार ठेकेदार गौरव प्रकाश पाटील यांना देण्यात आलेला आहे. सदर कामाची मुदत दि. २८/०३/२०२५ पावेतो होती. पुढील दुरुस्तीच्या कामासाठी ठेकेदार नियुक्त करण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. परंतु निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यास उशीर लागणार असल्याने पाणीपुरवठा विभागात दैनदिन होणाऱ्या दुरुस्तीच्या कामात अडचणी निर्माण होऊ शकता त्यामुळे भागातील पाणीपुरवठा देखील विस्कळीत होईल. तसेच **श्री. गौरव प्रकाश पाटील** यांनी मुदत वाढ करण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे. त्याकरिता सदर भागातील पाईपलाईन दुरुस्तीच्या कामाकरिता ठेकेदार गौरव प्रकाश पाटील यांना कामात ०१ वर्ष मुदत वाढ देण्याकरिता मे.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने उपरोक्त विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार प्रभाग क्र. १ ते ५ व १० मधील वितरण व्यवस्था व मुख्य लाईनचे लिकेज दुरुस्तीच्या कामी **श्री. गौरव प्रकाश पाटील यांना मागील मंजुर दराप्रमाणे** मुदत संपल्याच्या दिनांकापासुन पुढील १ वर्षासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५७०** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / पा.पु. /जा.क्र.६८ दिनांक २८ /०९/२०२५

विषय क्रमांक:-५९२ धुळे मनपा जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे ऍलम (तुरटी), पुरवठा करणेबाबत पुढील तीन वर्षा करीता निविदा दर मागविण्यात आलेले त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंता, विद्युत विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिका प्रशासकीय मान्यता क्र.०९ दि: ०३/०९/२०२५ मा. आयुक्त तथा प्रशासक, धुळे महानगरपालिका अन्वये धुळे महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अंतर्गत जलशुद्धीकरण केंद्रावर लागणारे

तुरटी (ऍलम) या रसायनांचा तीन वर्षाकरिता पुरवठा करणे (मनपा निधी अंतर्गत) item Rate नुसार सदर कामाबाबत ई-निविदा प्रक्रिया करणेस मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | पुरवठादार /उत्पादक नाव | दिलेले निलिदा दर (Item Rate) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. महालक्ष्मी ट्रेडर्स को., जळगाव | १३७००/- प्रती मे. टन | L१ |
| २ | मे. डॉल्फिन केमिकल्स | १३८५०/- प्रती मे. टन | L२ |
| ३ | मे. दनिशा इंटरप्राईजेस, जळगाव | १४५००/- प्रती मे. टन | L३ |

पुरवठादार/ उत्पादक मे. महालक्ष्मी ट्रेडर्स को.. जळगाव यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. १३७००/- प्रती मे. टन इतक्या रकमेची असुन ती सर्वात कमी दराने आहे.

तथापी मक्तेदारास धुमपा/पा.पु/ ६३ दि.२४/०९/२०२५ नुसार दर वाटाघाटी करीता बोलविले असता मक्तेदाराने त्यांच्याकडील पत्र दि.२५/०९/२०२५ च्या पत्रानुसार दर कमी करून १३५००/- प्रती मे.टन या प्रमाणे दर दिले आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव निविदा दर मान्यतेसाठी मे. स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे मनपा जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे ऍलम (तुरटी), पुरवठा करणेबाबत पुढील तीन वर्षाकरीता मे. महालक्ष्मी ट्रेडर्स को. जळगाव यांच्या रुपये १३५००/- प्रती मे. टन यांच्या सर्वात कमी दराने आलेल्या निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५७१** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / पा.पु. /जा.क्र. ६७ दिनांक २८/०९/२०२५

विषय क्रमांक:-५९३ धुळे मनपा जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे ब्लिचिंग पावडर पुरवठा करणे बाबत पुढील तीन वर्षा करीता निविदा दर मागविण्यात आलेले असून त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंता, विद्युत विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिका प्रशासकीय मान्यता क्र.०९ दि: ०३/०९/२०२५ मा. आयुक्त तथा प्रशासक, धुळे महानगरपालिका अन्वये धुळे महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अंतर्गत जलशुद्धीकरण केंद्रावर लागणारे टी.सी.एल ग्रेड-१ ( ब्लिचींग पावडर) या रसायनांचा तीन वर्षाकरिता पुरवठा करणे (मनपा निधी अंतर्गत) item Rate नुसार सदर कामाबाबत ई-निविदा प्रक्रिया करणेस मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | पुरवठादार /उत्पादक नाव | दिलेले निलिदा दर (Item | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. यश केमिकल्स | ३१२७० /- प्रती मे. टन | L१ |
| २ | मे. विक्रम केमिकल्स | ३१५५० /- प्रती मे. टन | L२ |
| ३ | मेतिरूपती केमिकल्स, | ३२६५५ /- प्रती मे. टन | L३ |

पुरवठादार/ उत्पादक मे. यश केमिकल्स यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. ३१२७० /- प्रती मे. टन इतक्या रकमेची असुन ती सर्वात कमी दराने आहे.

तथापी मक्तेदारास धुमपा/पा.पु/ ६४ दि.२४/०९/२०२५ नुसार दर वाटाघाटी करीता बोलविले असता मक्तेदाराने त्यांच्याकडील पत्र दि.२५/०९/२०२५ च्या पत्रानुसार दर कमी करून रू. ३०८००/- प्रती मे.टन या प्रमाणे दर दिले आहे. सदर प्रस्ताव मान्यतेस्तव मे. स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव सादर झालेला आहे..

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे मनपा जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे ब्लिचिंग पावडर पुरवठा करणेकामी पुढील तीन वर्षाकरीता मे. यश केमिकल्स यांचे सर्वात न्यूनतम दर रु. ३०८०० /- प्रती मे. टन यांस मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५७२** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / आरोग्य/जा.क्र. ५०८ दिनांक १९/०९/२०२५

विषय क्रमांक:-५९४ धुळे मनपा हद्दीतील पकडण्यात आलेल्या मोकाट जनावरांचा संगोपन व चारापाणी खर्च गोशाळेस अदा करणेबाबत झालेल्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

---

वाचा क्र.०१ व मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

सन २०२४ मध्ये धुळे शहरात मोकाट जनावरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढत असून मोकाट जनावरे मालक शहरातील पेठ भागात रस्त्यावर जनावर सोडत असल्याने सदर जनावर हे रस्त्यावर ठाण मांडून बसत असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना रहदारीस अडथळा निर्माण करीत होते.

सदर मोकाट जनावरांवर कारवाई करणे बाबत मा.आयुक्त सो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार आरोग्य (स्वच्छता) विभागामार्फत पथक तयार करण्यात आले असुन पकडलेले मोकाट जनावरे शहरातील कामधेनु गो शाळा, गोंदुर धुळे येथे जमा करण्यात येत होते.

त्यानुसार कामधेनु गो शाळा यांनी प्रती जनावर प्रती दिवस रु.५००/- या प्रमाणे खर्च सादर केला होता. कामधेनु गो शाळा, गोंदुर यांनी माहे ऑगस्ट-२०२४ पासुन दिनांक ६/८/२०२४ ते १४/९/२०२४ पावेतो एकुण २८६ जनावरांचा चारापाणी व सांभाळ खर्च एकुण रु.१,४३,०००/- बिल मिळणे बाबत विनंती केली आहे.

सन २०२५-२६ च्या मुळ अंदाजपत्रकातील मोकाट जनावरे पकडणे / गो शाळा खर्च या लेखाशिर्षकात रु.२० लक्ष तरतुद करण्यात आली असुन सदर तरतुदी मधुन उक्त बिलाची रक्कम अदा करण्याकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता तथा खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार धुळे मनपा हद्दीतील पकडण्यात आलेल्या मोकाट जनावरांचा संगोपन व चारापाणी खर्च कामधेनु गोशाळेस अदा करणेबाबत झालेल्या एकुण रु.१,४३,०००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये आर्थिक व प्रशासकीय कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५७३** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / पा.पु /जा.क्र.७२६ दिनांक २६/०९/२०२५

विषय क्रमांक:-५९५ प्रभाग क्र. ११, वरखेडी पुनर्वसन भागात HDPE पाईपलाईन टाकणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्य. अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

प्रभाग क्र. ११, वरखेडी पुनर्वसन भागात HDPE पाईपलाईन टाकणे. उक्तबाबत संबधित भागातील कनिष्ठ अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता सदरील पाईप लाईन लीकेज असल्यामुळे पाणी पुरवठा विस्कळीत होत असल्याकारणाने सदरील दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

सदर कामास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे SSR दरसूची सन २०२३-२४ नुसार **रु. ४,०९,०६०/-** मात्र खर्च अपेक्षित आहे.. तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने सदरचे काम विना निविदा **श्री. संजय गायकवाड, ठेकेदार** यांच्या कडून करून घेण्यास व कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियान १९४९ च्या कलम ६७ (३) अन्वये मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, प्रभाग क्र. ११, वरखेडी पुनर्वसन भागात HDPE पाईपलाईन टाकणेकामी झालेला खर्च **रु. ४,०९,०६०/-** मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५७४** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / वि.वि /जा.क्र.१८२ दिनांक ३०/०९/२०२५

विषय क्रमांक:-५९६ धुळे मनपा क्षेत्रातील जुने/बंद पथदिवे बदलणेसाठी आवश्यकतेनुसार विविध क्षमतेचे LED लाईट- पुरवठा करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---------------------------------------------------------------------------------------------------------------

वाचा क्र.०१ व उप अभियंता, विद्युत विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

उक्त कामाबाबत मा.आयुक्त धुळे महानगरपालिका, धुळे यांची प्रशासकीय मान्यता क्र. २२(अ) व दि.१८/०८/२०२५ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३,३७,०४,५६४/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ओम श्री मंगलमूर्ती इलेक्ट्रिकल्स & contractor, नाशिक | ०.०१ % कमीने | L1 |
| २ | मार्तंड एन्टरप्रायजेस, नाशिक | ५ % जास्तीने | |

निविदेमध्ये तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे. ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स & Contractors, नाशिक यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. ३,३७,०१,१९४/- इतक्या रकमेची असुन ती अंदाजपत्रकीय दराच्या ०.०१% कमीने आहे. त्यानुसार L१ मक्तेदार यांना मनपा पत्र क्र. १६९. दि. १८/०९/२०२५ नुसार दर वाटाघाटी करणे बाबत कळविले होते. त्यानुसार मक्तेदार यांनी पत्र दि. २९/०९/२०२५ नुसार अंदाजपत्रकीय दराच्या ८ % कमी प्रमाणे दर सादर केले आहेत. करिता ठेकेदार मे. ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स & Contractors, नाशिक. यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे. ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स & Contractors, नाशिक यांनी सर्वात कमी म्हणजेच दर वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दराच्या ८ % कमीने असून रक्कम (३,१०,०८,१९९/-) आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य मक्तेदाराची बयाना रक्कम ऑनलाईन पद्धतीने परतावा करण्यास मान्यतेस मे. स्थायी समिती पुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे मनपा क्षेत्रातील जुने/बंद पथदिवे बदलणेसाठी आवश्यकतेनुसार विविध क्षमतेचे LED लाईट- पुरवठा करणेकामी मे. ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स & Contractors, नाशिक यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या ८ टक्के कमी या आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५७५** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / बां.वि./जा.क्र.३०८ दिनांक ०१/१०/२०२५

विषय क्रमांक:-५९७ धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ३.० अंतर्गत गणेश कॉलनी येथील गणेश उद्यान येथे वृक्ष लागवड करणेकामी निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ३.० अंतर्गत गणेश कॉलनी येथील गणेश उद्यान येथे वृक्ष लागवड करणे कामास रक्कम रु. ३०,२३,५४६/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५९२/२०२४-२५ दिनांक ०५/०२/२०२५ अन्वये रक्कम रु.८४,१६,३७२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सौरभ संजय कदमबांडे | अंदाजपत्रकीय दराने | |
| २ | भूषण एल. चौधरी | शे.०.९९% कमीने | सर्वात कमी दर |
| ३ | ऋषभ राजेंद्र पाटील | शे.२.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री. भूषण एल.चौधरी** यांचे दर शे.०.९९% कमीने **सर्वात कमी दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार **श्री. भूषण एल.चौधरी** यांची **सर्वात कमी दर** आलेले निविदा दर मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ३.० अंतर्गत गणेश कॉलनी येथील गणेश उद्यान येथे वृक्ष लागवड करणेकामी **श्री. भूषण एल.चौधरी यांच्या शे.०.९९% कमी** या **सर्वात कमी दराने** आलेल्या या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५७६** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / बां.वि/जा.क्र. ३१० दिनांक ०१/१०/२०२५

विषय क्रमांक:-५९८ धुळे मनपाचा नवीन प्रशासकीय इमारत लगत पूर्व बाजूस सुरु असलेल्या रेकॉर्ड रूम बांधकामाचे वरील मजल्यावर कमांड कंट्रोल रूम बांधणेकामी निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे मनपाचा नवीन प्रशासकीय इमारत लगत पूर्व बाजूस सुरु असलेल्या रेकॉर्ड रूम बांधकामाचे वरील मजल्यावर कमांड कंट्रोल रूम बांधणे कामास रक्कम रु.७३,९८,४८३/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ १०० /२०२५-२६ दिनांक २९/०७/२०२५ अन्वये रक्कम रु.७३,७०,७९७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | आशिष एम. पटवारी | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.१.५०% जास्तीने | |
| ३ | हिंद कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |

व

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.आशिष एम. पटवारी** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.आशिष एम. पटवारी** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दर मंजुरी कामी मे. स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे मनपाचा नवीन प्रशासकीय इमारत लगत पूर्व बाजूस सुरु असलेल्या रेकॉर्ड रूम बांधकामाचे वरील मजल्यावर कमांड कंट्रोल रूम बांधणेकामी **श्री.आशिष एम. पटवारी** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेले सर्वात कमी या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५७७** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / भां.वि./जा.क्र. ३१ दिनांक ०१/१०/२०२५

विषय क्रमांक:-५९९ धुळे महानगरपालिका श्री गणेश उत्सव-२०२५ करीता अनंत चतुर्दशीच्या दिवशी मनपा कर्मचारींना जेवणाची व्यवस्था करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व प्र भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

श्री गणेश उत्सव-२०२५ करीता अनंत चतुर्दशीच्या दिवशी मनपा कर्मचारींना जेवणाची व्यवस्था करणे बाबत मा.उपायुक्त सो. जा.क्र./धुमपा/आरोग्य/३९४/२०२५-२६ दि.२१/०८/२०२५ रोजीचे कार्यवाही करणे बाबत भांडार विभागास आदेश प्राप्त झालेले आहे.

त्या अनुषंगाने अनंत चतुर्दशी दि.०६/०९/२०२५ रोजी आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षक, मुकादम, सफाई कामगार यांची मुर्ती संकलन निर्माल्य स्विकारणेकामी मुर्ती विसर्जन होईपावेतो सदर कामी रात्री उशिरापर्यंत सर्व कर्मचारी हजर राहतात त्यानुसार कर्मचा-यांना रात्रीच्या जेवणाची व्यवस्था करणे अत्यंत गरजेचे आहे.

विभागाने मागणी केलेल्या सेवेची आवश्यकता, निकड व कालावधी इत्यादी विचारात घेता सदरची सेवा तातडीने देण्यात आलेली आहे तरी कर्मचारीना जेवणाची व्यवस्था करणेत आली असुन त्यानुसार एकूण खर्च व सर्व करासोबत रुपये **७४,३४०/-** मात्र चे बिल प्राप्त झालेले आहे. त्यानुसार मे. स्थायी समिती पुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिका श्री गणेश उत्सव-२०२५ करीता अनंत चतुर्दशीच्या दिवशी मनपा कर्मचारींना जेवणाची व्यवस्था करणेकामी झालेला खर्च एकूण रुपये **७४,३४०/-** मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) नुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५७८** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /पा.पु. /जा.क्र.७४८ दिनांक ०१/१०/२०२५

विषय क्रमांक:-६०० तिरुपती नगर भागात HDPE पाईप लाईन टाकणे, प्रभात नगर परिसरात DI पाईपलाईन टाकणे, नवरंग जलकुंभा जवळ व्हॉल दुरुस्त करणे तसेच सुधा हॉस्पिटल जवळ नविन व्हॉल टाकणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्य. अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

तिरुपती नगर भागात HDPE पाईप लाईन टाकणे, प्रभात नगर परिसरात DI पाईपलाईन टाकणे, नवरंग जलकुंभा जवळ व्हॉल दुरुस्त करणे तसेच सुधा हॉस्पिटल जवळ नविन व्हॉल टाकणे बाबत. उक्तबाबत संबधित भागातील क. अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता सदर काम करणे अत्यावश्यक आहे.

प्रस्तावात नमुद कामासाठी शासन दरसूची/म.जी.प्रा.विभाग/२०२३-२४ नुसार **अंदाजपत्रकीय रक्कम रू. २,३९,७६० /-** मात्र खर्च अपेक्षित आहे.सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार **नवीन पाईप लाईन टाकणे** निधीतुन कामासाठी **रू. ५० लक्ष** मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. **२,३९,७६०/-** चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा ठेकेदार **श्री. सचिन कोडगीर, ठेकेदार** यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता मे. स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, तिरुपती नगर भागात HDPE पाईप लाईन टाकणे, प्रभात नगर परिसरात DI पाईपलाईन टाकणे, नवरंग जलकुंभा जवळ व्हॉल दुरुस्त करणे तसेच सुधा हॉस्पिटल जवळ नविन व्हॉल टाकणेकामी झालेला खर्च रक्कम रु. **२,३९,७६०/-**मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) नुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५७९** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / पा.पु./जा.क्र.७४६ दिनांक ०१/१०/२०२५

विषय क्रमांक:-६०१ प्रभाग क्र. १४, १७, व १८ येथे पाईप लाईन वर व्हॉल टाकणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्य. अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

प्रभाग क्र. १४, १७, व १८ येथे पाईप लाईन वर व्हॉल टाकणे बाबत. उक्तबाबत संबधित भागातील क. अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता सदर काम करणे अत्यावश्यक आहे.

प्रस्तावात नमुद कामासाठी शासन दरसूची/म.जी.प्रा.विभाग/२०२३-२४ नुसार **अंदाजपत्रकीय रक्कम रू. २,४६,४६६/-** मात्र खर्च अपेक्षित आहे.सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार **पाईप लाईन दुरुस्ती** निधीतुन कामासाठी **रू. २.०० कोटी** मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. **२,४६,४६६/-** चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा ठेकेदार **श्री. संजय गायकवाड, ठेकेदार** यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार प्रभाग क्र. १४, १७, व १८ येथे पाईप लाईन वर व्हॉल टाकणेकामी झालेला खर्च रक्कम रुपये **२,४६,४६६/-** मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) नुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

याबाबत विभागामार्फत पाईपलाईन दुरस्ती तसेच याकामी साहित्य पुरविणे व देखभाल दुरस्ती यासाठी वार्षिक निविदा दर मागविणेबाबत कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५८०** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / पा.पु. /जा.क्र.७४७ दिनांक ०१/१०/२०२५

विषय क्रमांक:-६०२ प्रभाग क्र. १७ शिवशक्ती कॉलनी येथे पाईपलाईन टाकणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्य. अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

प्रभाग क्र. १७ शिवशक्ती कॉलनी येथे पाईपलाईन टाकणे बाबत उक्तबाबत संबधित भागातील क. अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता सदर काम करणे अत्यावश्यक आहे.

सदर प्रस्ताव नमुद कामासाठी शासन दरसूची/म.जी.प्रा.विभाग/२०२३-२४ नुसार **अंदाजपत्रकीय रक्कम रू. १,६०,३९१/-** मात्र खर्च अपेक्षित आहे.सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार **पाईप लाईन दुरुस्ती** निधीतुन कामासाठी **रू. २.०० कोटी** मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. **१,६०,३९१/-** चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा ठेकेदार **श्री. यासीन शेख जब्बार, ठेकेदार** यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार प्रभाग क्र. १७ शिवशक्ती कॉलनी येथे पाईपलाईन टाकणेकामी झालेला खर्च रक्कम रुपये **१,६०,३९१/-** मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) नुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५८१** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /बां.वि. /जा.क्र. ३१५ दिनांक ०६/१०/२०२५

विषय क्रमांक:-६०३ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र ०२ मध्ये भगवती नगर अंतर्गत सिमेंट काँक्रीट रोड करणे (भगवती नगर बोर्ड ते संतोषी माता मंदिर) कामी आलेल्या निविदा दरास मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र ०२ मध्ये भगवती नगर अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रोड करणे (भगवती नगर बोर्ड ते संतोषी माता मंदिर) बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/१०५३/२०२४-२५ दि.०७/१०/२०२४ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. २९,९८,१६७/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.उक्त कामाबाबत उप.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४१०/२०२४-२५ दि.२७/०९/२०२४ अन्वये रक्कम रु. २९,९८,१६७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे. स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.2% जास्तीने | |
| 2 | मे. आशिष एम. पटवारो | शे.1% जास्तीने | |
| 3 | मे. अमोल शंकर हांबरे | शे.5 % कमीने | |
| 4 | मे. प्रथमेश पोपटराव मोरे | शे.2% कमीने | |
| 5 | मे. सिद्धेश कन्सट्रक्शन | शे.0.90 % कमीने | |
| 6 | मे. मयूर दिनेश चव्हाण | अंदाजपत्रकीय दराने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री/मे. अमोल शंकर हांबरे** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 28,48,258/- इतक्या रक्कमेचे असून **शे.५% कमी** दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री/मे. अमोल शंकर हांबरे** यांचे दर शे.**५% कमी** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/**मे. अमोल शंकर हांबरे** यांची शे.5% कमी दराने आलेले निविदा दर मे. स्थायी समिती पुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र ०२ मध्ये भगवती नगर अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रोड करणे (भगवती नगर बोर्ड ते संतोषी माता मंदिर) कामी श्री/**मे. अमोल शंकर हांबरे** यांच्या **शे.५%** कमी या निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.५८२** **दिनांक: ०९/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /बां.वि. /जा.क्र.३१४ दिनांक ०६/१०/२०२५

विषय क्रमांक:-६०४ धुळे मनपा हद्दीत प्र.क्र. ७ मधील संभाजी नगर साक्री रोड येथील चौक सुशोभिकरण करणेकामी निविदा दर मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे मनपा हद्दीत प्र.क्र. 7 मधील संभाजी नगर साक्री रोड येथील चौक सुशोभिकरण करणे कामास रक्कम रु.४९,९०,९३१/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ९५ /२०२५-२६ दिनांक २५/०७/२०२५ अन्वये रक्कम रु. ४९,९०,९३१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | संदीप तुकाराम हजारे | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | प्रतिक पुशोत्तम पुरोहित | शे.१.% जास्तीने | |
| ३ | कुणाल जयकर पवार | शे.२.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.संदीप तुकाराम हजारे** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.संदीप तुकाराम हजारे** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दर मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे मनपा हद्दीत प्र.क्र. ७ मधील संभाजी नगर साक्री रोड येथील चौक सुशोभिकरण करणेकामी **श्री.संदीप तुकाराम हजारे** यांचे आलेले दर **अंदाजपत्रकीय दराने** असून या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**